FYBA 6/4/24

Seat No:- ____________

कालावधी: - 3 hrs 12506424 M गुण :- 100

नोट : - (1) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
(3) उजवीकडील आकडे पुर्ण गुण दर्शवितात.

प्रश्न १. अ 'पशु व झुलवे' या कवितांचा अर्थ स्पष्ट करा? 20M

किंवा

आ 'जाणीव' 'बापूजींना उद्देशून' या कवितेचे आशय वैशिष्ट्य स्पष्ट करा.

प्रश्न २. अ 'काव्यरंग' या कविता संग्रहाच्या आधारे 'ग्रामीण जीवन' व्यक्त करणाऱ्या कथांचा आढावा द्या? 20M

किंवा

आ 'काव्यरंग' या कवितासंग्रहाच्या आधारे राष्ट्रप्रेमाबरोबर सामाजिक अभिसरण प्रकट करणाऱ्या कवितांचा आढावा घ्या?

प्रश्न ३. अ पुढीलपैकी दोन टिपा लिहा. 10M

१. "शोध" मधील समाजाची अवस्था.
२. "बापूजींना उद्देशून" या कवितेतील विचार मांडा
३. "आंघोळ न केलेला पाऊस" या कवितेतील दारिद्रयाचे वर्णन
४. " तिच बाई होत जाण" यातील स्त्रीची व्यथा.

प्रश्न ४. अ उत्कर्ष विद्यामंदीर शाळेतील वार्षीक सर्वसाधारण सभा संपन्न झाली या सभेचे इतिवृत्त लिहा. 10M

किंवा

आ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची रजतजयंती साजरी करण्यासाठी तुमच्या सोसायटीतील रहिवाशांनी आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त तयार करा.

प्रश्न ५. अ 'हिमालया' साबणाची जाहिरात तयार करा. 10M

किंवा

आ वहयापुस्तके (स्टेशनरी) दुकानाची जाहीरात तयार करा.

प्रश्न ६. खालील दिलेल्या उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा. 10M

समाजातील विविध मानवी मनाच्या महत्वकांक्षाच्या कोणत्या दिशेने हाकलावयास पाहीजे हे दाखविण्यासाठी मासिक पुस्तकातील लेख म्हणजे जणू काही होकायंत्र होय असे म्हटल्यासारखच नाही. जुन्या व नव्या वाडमयाचे परीक्षण याचा उद्देशाने मासिक पुस्तकातून करण्यात येते मासिक पुस्तकावर पथ्य सांगणारे धन्वंतरी लोक होत. नाटकात भिन्न–भिन्न भूमिका घेणाऱ्या अनेक वर्गाचे सूत्रधार आहेत असे म्हणावयास हरकत नाही.

प्रश्न ७. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. 10M

आपण ज्या संस्कृती अथवा गटाचा भाग आहोत त्यातील समूह केडिंततेला प्रोत्साहन देण्याची वृत्ती नजरेस पडते समूह केंद्रीयतेची अतिरेकी भावना सामाजिक ऐक्यासाठी घातक ठरते. सामाजिक बांधिलकी साठी इतर संस्कृतीचा आदर, स्व–समीक्षा, टीकात्मक परीक्षण आणि आत्मचिंतन होणे गरजेचे असते. आपण ज्या वैविध्याचा भाग आहोत त्याची अनेकांनी प्रशंसा करण्यासाठी असा दृष्टिकोन हितकारक ठरेल भावना, श्रध्दा आणि धोके समजून घेण्यासाठी लोकांच्या जीवनकथा उपयुक्त ठरतात.

समाजाच्या प्रगतीमध्ये बाधा आणणाऱ्या किंवा समाजाचे विभाजन करणाऱ्या घटकांचा प्रभाव कमी करण्यासाठी नागरी समाजाची भूमिका महत्वपूर्ण ठरु शकेल.

प्रश्न १. सामाजिक हितास कोणती प्रवृत्ती घातक ठरते?

२. लोकांच्या जीवनकथा कोठे उपयुक्त ठरतात?

३. सामाजिक हिताच्या संवर्धनासाठी कोणत्या कृती अपेक्षित.

४. उताऱ्या विषयी तुमचे मत?

५. उताऱ्याला समर्पक शिर्षक?

प्रश्न ८. खाली दिलेल्या कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा. 10M

१. स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

२. सार्वजनिक क्षेत्राचे महत्व

३. शिक्षण ही काळाची गरज

४. माय मराठीचे मनोगत